राज्यातील २४७ नगरपरिषदा व ४२ नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या नेमणूकीबाबत.

सत्यमेव जयते

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र

निवडणूक प्राथम्य
ई-मेलद्वारे

क्र.रानिआ२०२५/नि.नि.अ/नप/प्र.क्र.१३/का-६
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ३०/१०/२०२५

## -: आदेश :-

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे पर्यवेक्षण, संचालन व नियंत्रण याची सर्व जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे.

आणि ज्याअर्थी, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक प्रक्रिया कर्तव्यदक्ष व नि:पक्ष अधिकारी यांच्याद्वारे हाताळण्याकरिता राज्य निवडणूक आयोगाचे दि.१६/०७/२०२५ रोजीच्या आदेशान्वये निवडणूक निर्णय अधिकारी व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी किंवा निवडणुकीशी संबंधीत इतर कामासाठी अधिकारी यांची नियुक्ती करण्यासाठी सूचना निर्गमित केल्या आहेत.

ज्याअर्थी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ च्या नियम ५ व नियम ६ अन्वये नगरपरिषदा व नगरपंचायती सार्वत्रिक निवडणुकीचे कामकाज पार पाडण्याकरीता निवडणूक निर्णय अधिकारी यांची नेमणूक करण्यात येते व त्यांच्यावर कामाची जबाबदारी सोपविण्यात येते. त्या संदर्भात राज्य निवडणूक आयोगाने यापूर्वी निर्गमित केलेले दि.२३ सप्टेबर,२०१६ चे आदेश रद्द करुन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत:-

१. नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणुकांसाठी निवडणूक निर्णय अधिकारी व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या नेमणूकीचे निकष खालीलप्रमाणे असतील:-

अ) निवडणूक निर्णय अधिकारी :-

i. "अ" व "ब" वर्ग नगरपरिषदेकरीता एक स्वतंत्र उपजिल्हाधिकारी संवर्गातील अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात यावी.

ii. जिल्ह्यामध्ये आवश्यकतेप्रमाणे उपजिल्हाधिकारी उपलब्ध नसतील तर विभागीय आयुक्त यांनी इतर जिल्ह्यातून उपजिल्हाधिकारी उपलब्ध करुन घ्यावेत.

iii. "क" वर्ग नगरपरिषदा व नगरपंचायतींकरीता तहसिलदार संवर्गातील अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात यावी.

iv. जिल्ह्यामध्ये आवश्यकतेप्रमाणे तहसिलदार उपलब्ध नसतील तर विभागीय आयुक्त यांनी इतर जिल्ह्यांमधून तहसिलदार उपलब्ध करुन द्यावेत.

v. नेमणूक करतांना आयोगाच्या दि.१६/०७/२०२५ रोजीच्या आदेशामधील निकष पाळून नेमण्यात येणाऱ्या अधिकाऱ्याची सचोटी प्रामाणिक व त्यास निवडणुकीचा अनुभव असणे आवश्यक आहे.

आ) सहायक निवडणूक निर्णय अधिकारी:-

i. प्रत्येक नगरपरिषद व नगरपंचायतींमधील मुख्याधिकारी यांची सहायक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नेमणूक करावी.

ii. याशिवाय, आवश्यक असेल तर "अ" व "ब" वर्ग नगरपरिषदेकरीता तहसिलदार संवर्गातील अधिकारी तसेच "क" वर्ग नगरपरिषद व नगरपंचायतींकरीता नायब तहसिलदार संवर्गातील अधिकारी यांची अतिरिक्त सहायक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नेमणूक करावी.

iii. नेमणूक करतांना आयोगाच्या दि.१६/०७/२०२५ रोजीच्या आदेशामधील निकष पाळून नेमण्यात येणाऱ्या अधिकाऱ्याची सचोटी प्रामाणिक व त्यास निवडणुकीचा अनुभव असणे आवश्यक आहे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(सुरेश काकाणी)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत :- १) अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
२) प्रधान सचिव (२), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
३) विभागीय आयुक्त, सर्व
४) जिल्हाधिकारी, सर्व

५) संबंधित नगर परिषदा व नगरपंचायतींचे मुख्याधिकारी
६) राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयातील सर्व कार्यासने